# व्यवसाय शिक्षण विद्यापीठ (व्होकेशनल युनिर्व्हसिटी)

भारतामध्ये व्यवसाय शिक्षण योजनेचा विस्तार करण्याची तातडीची गरज असल्याचे सिंबायोसिसने जाणले आहे आणि त्यामुळेच व्यवसाय शिक्षण विद्यापीठाची कल्पना भारतात पहिल्यांदाच सिंबायोसिसने पुढे आणली आहे. व्यवसाय शिक्षण विद्यापीठामुळे विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षणाच्या निरनिराळया शाखांमध्ये उच्च शिक्षण घेण्याच्या सुविधा उपलब्ध होतील.

सिंबायोसिसने भारतात आणि भारताबाहेर व्यवसाय शिक्षणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला आहे व त्यामध्ये असे आढळून आले आहे की, रोजगार आणि कामगार उपलब्धता यांच्यामध्ये विषमता आहे त्याचप्रमाणे उच्च व्यवसाय शिक्षण घेण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना फार कमी सुविधा उपलब्ध आहेत. जे विद्यार्थी पॉलिटेकनिक्समध्ये पदवीका अभ्यासक्रम शिकत आहेत किंवा जे विद्यार्थी ११ वी आणि १२ वीमध्ये व्यवसाय शिक्षणाचे अभ्यासक्रम शिकत आहेत अशा विद्यार्थ्यांना उच्च व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध नाहीत. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या कौशल्याचा त्यांना काही उपयोग होत नाही. त्याचप्रमाणे अशा विद्यार्थ्यांना नेहमीच्या अभ्यासक्रमास (कनव्हेनशनल) प्रवेश घेण्याची संधी उपलब्ध होत नाही.

सिंबायोसिसने घेतलेल्या आढाव्यानुसार खालीलप्रमाणे सुचविण्यात येत आहे

१. **माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षण** :– शाळामध्ये ८ वी इयत्तेपासूनच व्यवसाय शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरु करावेत. अशा शाळांनी नेहमीचे अभ्यासक्रम आणि व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम असे दोन्ही अभ्यासक्रम राबवावेत. एस.एस.सी./१० वी (व्यवसाय शिक्षण) उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ११ वी मध्ये नेहमीच्या (कनव्हेनशनल) अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात यावा.एच.एस.सी/१२ वी (व्यवसाय शिक्षण) उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पॉलिटेकनिकच्या पदवी अभ्यासक्रमास तृतीय वर्षास प्रवेश देण्यात यावा.

२. **जागतीक बॅंकेचा अहवाल २००६** :– व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण पध्दती असे दर्शविते की, नोकरी देणाऱ्या संस्था/अस्थापना सर्व साधारण शिक्षण व त्याच्या जोडीला व्यवसाय शिक्षणातील कौशल्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये रोजगार मिळविण्याची क्षमता येण्यासाठी शाळांमधील अभ्यासक्रमांमध्ये नेहमीच्या शिक्षणाच्या बरोबरीने व्यवसाय शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचाही समावेश असणे आवश्यक आहे.

३. **व्यवसाय शिक्षण विद्यापीठाची स्थापना** निरनिराळया राज्यात करता येणे शक्य आहे. व्यवसाय शिक्षण विद्यापीठ उच्च व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम राबवू शकेल. असे विद्यापीठ व्यवसाय शिक्षण

अभ्यासक्रमातील पदवी, पदव्युत्तर आणि पी.एच.डी पदव्या देऊ शकेल. सध्याच्या व्यवसाय शिक्षण संस्था, कम्युनिटी कॉलेजेस, कम्युनिटी पॉलिटेकनिक इ. अशा विद्यापीठास सलग्न होऊ शकतील.

४. **औद्यागिक संस्थांचा सहभाग :–** व्यवसाय शिक्षण पध्दती आणि व्यवसाय शिक्षण विद्यापीठामध्ये औद्योगिक संस्थांचा सहभाग असणे आवश्यक आणि महत्वाचे आहे. सिंबायोसिस असे सुचवित आहे की, औद्योगिक संस्थांचा सहभाग हा अभ्यासक्रम तयार करण्यामध्ये त्याचप्रमाणे उत्पादनाशी निगडीत असे संशोधन आणि नाविण्यपूर्ण प्रयोगशाळा स्थापन करण्यामध्ये आवश्यक आहे.

५. **शिक्षकांचे प्रशिक्षण आणि विकास** असा स्वतंत्र विभाग व्यवसाय शिक्षण विद्यापीठामध्ये स्थापन करण्यात यावा. तसेच बॅचलर इन व्होकेशनल एज्युकेशन किंवा बी.एड विथ स्पेशलायझेशन इन व्होकेशनल एज्युकेशन अशी स्वतंत्र पदवी प्रस्थापित करण्यात यावी. व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांमध्ये नेमण्यात येणाऱ्या शिक्षकांना वरील पदवी असणे आवश्यक करावे.

६. **व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमामधील** बॅचलर इन व्होकेशनल स्टडीज आणि मास्टर्स इन व्होकेशनल स्टडीज अशा स्वतंत्र पदव्या विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत प्रस्थापित करण्यात याव्यात. त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण विद्यापीठात व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेश घेणे सुलभ जाईल.

७. **राष्ट्रीय पातळीवर आणि राज्य पातळीवर** व्यवसाय शिक्षणाबाबतचे धोरण आणि शैक्षणिक पात्रतेविषयक आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या खाजगी आणि व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्थांची तपासणी करुन त्यांना केंद्रिय मंडळाने प्रमाणित करणे आवश्यक आहे.

सध्या भारतात व्यवसाय शिक्षण विद्यापीठ स्थापन करण्यात आलेले नाही. तथापि श्रीलंका, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया इ. देशात व्यवसाय शिक्षण विद्यापीठाची कल्पना चांगलीच रुजली आहे. या सर्व देशांमध्ये व्यवसाय शिक्षण पध्दती ही विद्यार्थ्यांना फारच आवडलेली आहे.

वरील लेखामध्ये व्यक्त करण्यात आलेली मते आणि सुचना लेखिकेच्या वैयक्तिक अशा आहेत. वरील लेख तयार करण्यासाठी निरनिराळया इंटरनेटवरील माहितीचा उपयोग करण्यात आलेला आहे व त्यासाठी लेखिका कृतज्ञता व्यक्त करत आहे.

व्यवसाय शिक्षण पध्दतीची उपयुक्तता आणि व्यवसाय शिक्षण विद्यापीठाची स्थापनेची गरज या सुचनेचे वाचक स्वागत करतील अशी लेखिकेला आशा आहे.

हा लेख तयार करण्यासाठी बरीचशी माहिती ही इंटरनेट, जागतीक बॅक अहवाल २००६ आणि इतर स्त्रोत यांच्या माध्यमातून घेण्यात आली आहे. आम्ही त्या सर्वांबद्‌दल कृतज्ञता व्यक्त करतो.

वाचकांनी त्यांचे मते/सुचना श्रीमती स्वाती मुजूमदार, संचालिका, सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग यांना पुढील ईमेल पत्त्यावर पाठवाव्यात. Email :- director@scdl.net.